पोलीस स्टेशन, वरुड
सत्यमेव जयते
जि. अमरावती

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण **P.S.(ठाणे):** वरुड
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0363 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**23/05/2025 00:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 22/05/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/05/2025
**Time From (वेळेपासून):** 13:07 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:53 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 22/05/2025 **Time (वेळ):** 23:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 051
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/05/2025 23:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सक्षम इलेक्ट्रीकल्स , वरुड ,वरुड

(c)**In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



PDF Scanner ACE Scanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** नयन अरूणराव वानखडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | एलआयसी ऑफिसजवळ वार्ड नं 4 वरुड,वरुड ,वरुड ,अमराबती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | एलआयसी ऑफिसजवळ वार्ड नं 4 वरुड,वरुड ,वरुड ,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9921039177

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. महेश मुरलीधर दुपारे | | | 1. इंदिरा गांधी नगर,,विनाके लेआउट प्लट नं 28 नागपुर, नागपुर ,यशोधरा नगर,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | शरद ज्ञानेश्वर बेलसरे | | | 1. संभा पेठ, राजुरा नाका वरुड , वरुड ,वरुड ,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**



PDF Scanner ACE Scanner

पोलीस स्टेशन, वरुड
जि. अमरावती



**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

हकिकत - अशा प्रकारे आहे की, फिर्यादी नयन अरूणराव वानखडे, वय 38 वर्ष, व्यवसाय इलेक्ट्रीक कॉन्टक्टर, राह. एल.आय.सी. ऑफिसजवळ, वार्ड नं. 4, वरूड, ता. वरूड, जि. अमरावती, मोबाईल नं. 9921039177मी समक्ष उपस्थित राहुन फिर्याद देतो की, वरीलप्रमाणे इलेक्ट्रीक कॉन्ट्रक्टर असुन माझे सक्षम इलेक्ट्रीकल्स या नावाने एम.एस.ई.डी.सी.एल.चे इलेक्ट्रीक कामकाज करण्याचे लायसन्स असुन सदर लायसन्स सन 2024 मध्ये 3 वर्ष कालावधीकरीता नुतनीकरण केलेले आहे. त्या आधारे मी शासन मान्यतेचे इलेक्ट्रीकचे कामे घेत असतो. सध्या माझे वरूडमध्ये चैधरी मंगल कार्यालय ते पार्डी रोड तसेच शासकिय विश्रामगृह ते मटन मार्केट यामध्ये होणारे नवीन रस्त्याचे कामामध्ये येणारे इलेक्ट्रीक पोल व इलेक्ट्रीक डि.पी. हटविण्याचे काम चालु आहे. सदरचे काम मी बोंद्रे कन्स्ट्रक्शन या कंपनीकडुन घेतले आहे. त्यांचेकडे इलेक्ट्रीक काम करण्याचे शासकिय लायसन्स नसल्याने त्यांनी सदरचे काम मला दिलेले आहे. सदरचे दोन्ही कामे मिळुन मला एकुण 92.51 लाखाचे काम मिळाले आहे. सदरचे काम सुरू असुन त्या कामाची कॉन्ट्रक्ट मिळण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली असुन एम.एस.ई.डी.सी.एल कडुन वर्क ऑर्डर मिळालेली आहे.सदर काम केल्याचे बिले नगर परिषद, वरूड येथे सादर केल्यानंतर तेथुन बिलातील कामाचे , मोजमाप पुस्तिका मंजुर करून कामाचे बिल मंजुरीकरीता लेखा शाखेत पाठविल्यानंतर लेखा शाखेतुन बिल मंजुर झाल्यानंतर मला पैसे मिळतात. परंतु नगर परिषद, वरूड येथील इंजिनियर श्री. दुपारे हे मोजमाप पुस्तिका मंजुर करून बिल मंजुरीसाठी लेखाशाखेत पाठवण्यासाठी माझेकडे पैशांची मागणी करीत आहेत. सध्या श्री. दुपारे यांचेकडे माझे एक 3,00,000/-रू व एक 2,50,000/-रू. चे बिल मोजमाप पुस्तिका मंजुर करून लेखा शाखेत पाठविण्याकरीता प्रलंबित आहे. परंतु सदर बिलाचे मोजमाप पुस्तिका मंजुर करून बिल मंजुरीसाठी लेखाशाखेत पाठवण्यासाठी इंजिनियर श्री. दुपारे साहेब हे बिल रक्कमेपैकी 35 टक्के लाच रक्कमेची मागणी करीत आहे. परंतु मला त्यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांचेवर अँन्टी करप्शनची कारवाई होण्यास विंनती आहे. अशा आशयाची मी पोनि भारत जाधव साहेब यांना फोनवरून तक्रार केली होती. त्या तक्रारीवरून पोनि भारत जाधव साहेब हे दिनांक 19/05/2025 रोजी प्रादेशीक परिवहन विभाग कार्यालय, अमरावती येथील दोन शासकिय पंच क्र. 1. श्री. विरेंद्र पटेल, 2. श्री. गणेष शिरगीरे यांचेसह हिंदु स्मशान भुमी, जरूड, ता. वरूड, जि. अमरावती येथे आले. तेथे मी हजर झाल्यानंतर पोनि भारत जाधव यांनी त्यांचा व त्यांचेसोबत आलेले पंच व स्टाफ यांचा परिचय करून दिला. त्यांनतर मी त्यांना एका लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याचे सांगितले असता पोनि जाधव यांनी मला थोडक्यात तोंडी तक्रार सांगण्यास सांगितले. सदरची तक्रार ऐकुन पोनि जाधव यांनी मला माझी तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितले असता त्याप्रमाणे मी लेखी तक्रार लिहुन दिली आहे. सदरची तक्रार पोनि जाधव व उपस्थित पंचांनी वाचुन पाहिली. मी तोंडी सांगतलेली तक्रार व लेखी केलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्याने पंचानी माझे तक्रारीवर शेरा लिहून सहया केल्या व श्री. जाधव साहेबांनी सुध्दा सही केली. त्यानंतर श्री. जाधव साहेब यांनी नगर परीषद, वरूड येथे जावुन इंजिनियर श्री. दुपारे साहेब यांची खरोखरच लाचेची मागणी आहे किंवा कसे? याची पडताळणी करणे आवश्यक असल्याचे सांगुन दोन्ही पंचास व मला व्हाईस रेकॉर्डर बद्दल माहीती सांगुन त्याबाबतची कार्यपध्दती सांगितली व प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर इंजिनियर श्री. दुपारे साहेब हे कार्यालयात उपस्थित आहे का? याची खात्री करण्याकरीता मी त्यांचे मोबाईल क्रमांकावर फोन केला असता, त्यांनी उदया दुपारी येण्यास सांगितले. त्यावरून पडताळणी कार्यवाही दिनांक 20/05/2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पडताळणी पूर्व पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर दिनांक 20/05/2025 रोजी पोनि जाधव साहेब, पंच व त्यांचा स्टाफ असे हिंदु स्मशान भुमी, जरूड, ता. वरूड, जि. अमरावती येथे आले. त्यावेळी जाधव साहेबांनी मला इंजिनियर श्री. दुपारे साहेब यांना कॉल करून कोठे भेटायला येवु असे विचारायला सांगितलेवरून मी इंजिनियर श्री. दुपारे साहेब यांना कॉल करून कुठे भेटायला येवु असे विचारले असता इंजिनियर श्री. दुपारे साहेबांनी मला त्यांचे अग्निशमन कर्मचारी क्वॉटर्स समोरील मोकळी जागा, वरूड येथे बोलावले. त्यावरून लागलीच जाधव साहेबांनी पडताळणी पुर्व पंचनाम्यातील सुचनांची उजळणी करून दिली. त्यानंतर माझे जवळ व्हाईस रेकॉर्डर सुरू करून देवुन मला व पंच क्रमांक 1 श्री. पटेल यांना इंजिनियर श्री. दुपारे साहेबांना भेटण्यासाठी अग्निशमन कर्मचारी क्वॉटर्स समोरील मोकळी जागा, वरूड येथे पाठविले असता मी व पंच क्र. 1 श्री. पटेल असे अग्निशमन कर्मचारी क्वॉटर्स समोरील मोकळी जागा, वरूड येथे गेलो, त्यावेळी माझी दुपारे साहेबांची भेट झाली. त्यावेळी पंच क्र. 1 पटेल हे माझे सोबतच होते. भेटी दरम्यान दुपारे साहेब व माझेमध्ये माझा बिलासंबंधी चर्चा झाली. चर्चेदरम्यान, दुपारे साहेबांनी मला मी केलेल्या कामाचे एम.बी. बुक मंजुर करून बिल मंजुरीसाठी पाठवणेकरीता तडजोडीअंती पंचासमक्ष 1,50,000/ रू लाचेची मागणी केली. तसेच दुपारे साहेब हे लगेचच नागपुरला जाणार असल्याचे मला सांगितले. तसेच लाच रक्कम नगर परीषद, वरूड येथील कंत्राटी कर्मचारी शरद बेलसरे यांचेजवळ देण्यासाठी सांगितले. त्यामुळे सर्वानुमते ज्यादिवशी दुपारे साहेब वरूड येथे कार्यालयात हजर असतील त्यावेळी दुपारे साहेब व कंत्राटी कर्मचारी शरद बेलसरे यांचेवर सापळा कार्यवाही आजमावणार असल्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर दिनांक 22/05/2025 रोजी दुपारे साहेब हे नगर परीषद, वरूड येथे येणार असल्याचे मी जाधव साहेबांना सांगितल्याने दिनांक 22/05/2025 रोजी जाधव साहेब, पंच व त्यांचा स्टाफ हिंदु स्मशान भुमी, जरूड, ता. वरूड, जि. अमरावती येथे आले. त्यावेळी जाधव साहेब यांनी मला दुपारे साहेब यांना देण्यासाठी लाच रक्कम 1,50,000/- हजर करण्यासाठी सांगितले असता मी जाधव साहेब यांना सांगितले कि, माझेजवळ फक्त 50,000/- रू आहेत. त्यावेळी सर्वानुमते माझेजवळील 50,000/- रू 500/- रू दराच्या 100 भारतीय चलनातील नोटा व भारतीय मनोरंजन बँकेच्या लहान मुलाच्या खेळण्याच्या 1,00,000/- रूपये किमंत असलेल्या 500/- रू दराच्या 200 डमी नोटां लाच रक्कम देण्यासाठी वापरण्याचे ठरवण्यात आले. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना जाधव साहेबांच्या सुचनेवरून पोलीस अमंलदार बहीरट मेजर यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर सापळापुर्व पंचनामा केला. त्यानंतर दुपारे साहेबांना कॉल करून पैसे कोठे घेवुन येवु, असे विचारले असता त्यांनी मला त्यांचे अग्निशमन कर्मचारी क्वॉटर्स, वरूड येथे बोलावले. त्यानंतर थोड्याच वेळात दुपारे साहेब यांनी फोन करून सांगितले की, लाच रक्कम कंत्राटी कर्मचारी शरद बेलसरे यांचेकडे दया, त्यांना मी तुमच्या मुलताई रोडवरील सक्षम इलेक्टीकल्स येथे पाठवतो. त्यामुळे सर्वानुमते माझे मुलताई रोडवरील सक्षम इलेक्टीकल्स येथे कंत्राटी कर्मचारी बेलसरे यांचेवर सापळा कार्यवाही आजमावण्याचे ठरवण्यात आले. त्यानंतर लागलीच मला लाच रक्कमेसह पंच क्रमांक 1 श्री. विरेंद्र पटेल यांचेसह माझेजवळ रेकॉर्डर सुरू करून मुलताई रोडवरील सक्षम इलेक्टीकल्स, वरूड येथे येथे कंत्राटी कर्मचारी बेलसरे यांची भेट घेण्याकरिता रवाना केले. त्यानंतर माझे सोबत व पाठोपाठ सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी व पंच असे सर्व सक्षम इलेक्टीकल्स, वरूड येथे येवुन आजुबाजुला आडोसा घेवुन दबा धरून बसले. मी सक्षम इलेक्टीकल्स, वरूड येथे आलो तेव्हा कंत्राटी कर्मचारी शरद बेलसरे हे मला माझे कार्यालयात दिसले नाही, तेव्हा मी बेलसरे फोन यांना करून विचारले असता शरद बेलसरे लगेच माझे सक्षम इलेक्टीकल्स येथील ऑफीसमध्ये आले. त्यावेळी मी व पंच क्र. 1 पटेल यांचेसह कंत्राटी कर्मचारी बेलसरे यांना भेटलो व बेलसरे यांना 'दुपारे साहेबांकडे माझे बिल पेडींग असुन ते पुढे पाठविण्याकरीता कमिशनचे 1,50,000/- रू. तुमच्याकडे देण्यास सांगितले आहे.' त्यावर बेलसरे यांनी सदरचे लाच रक्कम स्विकारून त्यांचे नेसते पॅन्टचे डाव्या खिशात ठेवले. त्यानंतर मी कंत्राटी कर्मचारी बेलसरे यांना दुपारे साहेबांना कॉल करून पैसे मिळाल्याबाबत सांगा, असे बोललो. त्यावेळी कंत्राटी कर्मचारी बेलसरे यांनी माझे व पंच क्र. 1 समोरच दुपारे साहेबांना पैसे मिळालेबाबत फोन करून सांगितले. त्यांनतर मी ही बेलसरे यांचे मोबाईलवरून दुपारे साहेबांशी मोबाईल फोन स्पिकरवर ठेवून दीड लाख रूपये बेलसरे यांचेकडे दिल्याचे सांगितलेवर समोरून दुपारे साहेब 'हो' असे बोलले. त्यानंतर मी, पंच क्र. 1 पटेल व बेलसरे ऑफीसच्या बाहेर आलो. त्यावेळी मी लागलीच सापळा पथकाला लाच स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथक त्या ठिकाणी आले. त्यांनतर जाधव साहेबांनी कंत्राटी कर्मचारी शरद बेलसरे यांना आपली ओळख सांगितली व लाचेची रक्कम पंचासमक्ष हस्तगत केली. त्याचवेळी यापूर्वी ठरल्याप्रमाणे पोनि मांजरे साहेब यांचे पथकाने इंजिनियर दुपारे साहेबांना एल.आय.सी. चैक, वरूड येथुन ताब्यात घेवुन माझे सक्षम इलेक्टीकल्स येथील ऑफीसमध्ये घेवुन आले. त्यावेळी जाधव साहेबांनी दोघांना त्यांचे पुर्ण नाव, पद, पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव 1) श्री. महेश मुरलीधर दुपारे, वय 38 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद विदयुत अभियंता (वर्ग 3), नगर परिषद, वरूड, ता. वरूड, जि. अमरावती, राह. इंदिरा गांधी नगर, विनाके लेआउट, प्लॉट नं. 28, नागपुर. 2) श्री. शरद ज्ञानेश्वर बेलसरे, वय 44 वर्ष, व्यवसाय कंत्राटी इलेक्ट्रीशन,



ACE Scanner

नगर परिषद, वरूड, ता. वरूड, जि. अमरावती, राह. संभा पेठ, राजुरा नाका, घर नं. 142, वरूड, ता. वरूड, जि. अमरावती असे असल्योच सांगितले. त्यानंतर जाधव साहेबांनी इंजिनियर दुपारे साहेब व कंत्राटी कर्मचारी शरद बेलसरे यांना ताब्यात घेवुन शासकीय विश्रामगृह, वरूड येथे घेवुन आले. त्यानंतर सविस्तर पंचनाम्याप्रमाणे कार्यवाही केली.अशाप्रकारे मी दिनांक 19/05/2025 रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 20/05/2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाहीवरून मी वरूडमध्ये केलेल्या कामाचे 3,00,000/-रू व 2,50,000 /-रू. बिलाची मोजमाप पुस्तिका मंजुर करून कामाचे बिल मंजुरीकरीता लेखा शाखेत पाठविणेकरीता यातील आलोसे श्री. महेश मुरलीधर दुपारे, वय 38 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद विद्युत अभियंता (वर्ग 3), नगर परीषद, वरूड, ता. वरूड, जि. अमरावती, यांनी तडजोडीअंती पंचासमक्ष 1,50,000/-रू. लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम कंत्राटी कर्मचारी शरद बेलसरे यांचेकडे देण्यास सांगितले. त्याप्रमाणे दिनांक 22/05/2025 रोजी 13.07 ते 13.53 वाजताचे दरम्यान पंचासमक्ष आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे श्री. महेश मुरलीधर दुपारे यांचेसाठी लाच रक्कम 1,50,000/-रू. कंत्राटी कर्मचारी श्री. शरद ज्ञानेश्वर बेलसरे यांनी स्विकारली. त्यामुळे श्री. महेश मुरलीधर दुपारे, पद-विद्युत अभियंता, नगर परिषद, वरूड तसेच कंत्राटी कर्मचारी श्री. शरद ज्ञानेश्वर बेलसरे यांचेविरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.माझी वरीलप्रमाणे मी सांगितलेली फिर्याद संगणकावर टंकलिखित केली असुन सदर फिर्यादीची प्रिंट मी वाचुन पाहिली असता ती घडलेल्या घटनाक्रमानुसार बरोबर व खरी नोंदवली आहे. अशा फिर्यादीचे लेखी तक्रारीवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

ARJUN BHANGAONRAO THOSRE(I (Inspector)) / BQBN770505 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



ACE Scanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** ARJUN BHANGAONR

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** POBN770505



PDF Scanner ACE Scanner